म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल. वा
दा. क्र. ८०८३
IRBK-0107073
IRBK-0107073

मौजेची साकर

सन-१९५८.

दा० क्र० ६०६३.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ६०६३ नों. दि. ...
वि. बा. वा ... क्र. ...

विभाग बालवाङ्मय
क्रमांक ८०२
नों. दि.
वाचनालय







# १ ऊठ बाळ !

चाल—जरी कुणा श्रीमंता सारखी ]

ऊठ ऊठ बाळा आतां उशिर फार झाला
थवा सोबत्यांचा दारीं जमुनि पहा आला ॥

कुतू चिऊ काऊ सारे अंगणांत आले
नाचुनी डुलून मिठूचें भजन सुरू झालें
गाढ गाढ निजसी परि तूं करीं धरुनि गाला १

गाय वांसरासह पाहीं अंगणांत आली
बघे आज इवल्या हातीं गवत कोण घाली
हंबरुनी पाहे भंवतीं कां न दिससि डोळां २

ताइ माइ टपुनी बसल्या तुला उचलण्यास
उभा बाळकूही दारीं दूर न्यावयास
कुणासही कांहिं सुचेना बघुनि तुज निजेला ३





IRBK-0107073
IRBK-0107073
सं. ठाणें
बालवाङ्मय
८०२



## २ झालों उंच !

चाल—जाके मथुरा सारखी ]

पहा पहा रे खुर्चीमध्यें चढलों झालों उंच !



मी मोत्याहुनिही उंच
मी अप्पाहुनिही उंच

मी आईहुनिही उंच
मी दादांहुनिही उंच



कं. दि.
वाचनालय शाखा



## ३ पाटी

चाल—असा माझा ससा कुणी सारखी ]

आइ माझी पाटी कुणीकडे गेली ? ॥

पहिली घंटा झालि पहा ही पट्टी कुठेंतरि पडली १
खिशांतली बघ पेनहि कुणितरि आहे पळवुन नेली २
काढुं कशी मी अतां उजळणी दुसरी घंटा झाली ३
सांगुन टाकिन नांव तुझें बघ बाई जर रागवली ४





## ४ बोकोबा

बोकोबा बोकोबा
आहे कुठें डोळा
दिसतो का कुठें
लोण्याचा गोळा ?







# ५ आहे बरें आई !

चाल——नखोल्या बाई नखोल्या सारखी ]

आहे बरें आई । आई
रडूं नको कांहीं । कांहीं

घालित्यें मी तोतो । तोतो
करित्यें मी जोजो । जोजो

लावित्यें मी तेल । तेल
पुरे आतां खेळ । खेळ

आणिला हा गडू । गडू
पाणी नको सांडूं । सांडूं

बुड बुड गंगे । गंगे
हरि पांडुरंगे । रंगे

गोरें गोरें पान । पान
अंग झालें छान । छान

दुखले का डोळे । डोळे
पुसुनीयां झालें । झालें

दूधू पिईं बाळा । बाळा
झोप आली डोळां । डोळां

करिं बाळा गाई । गाई
आहे बरें आई । आई



# ६ पापा

चाल—सानुल्या जरा तरी बघ हसून ]

म्हणुनि आइ
  माझा पापा असे गोड ।।

उठतांच सायसाखर
मग गोड दूध कपभर
देसि तूं खाउ त्यावर १

कुणि खारिक बिस्किट कुणी
कुणि मनुका दे आणुनी
हीं देत न मी टाकुनी २



# ७ वाघाची मावशी

चाल—नदीच्या शेजारीं ]

वाघाची मावशी
आहे का माहीत ?
चला या दावीतें
आमुच्या घरांत १

वाघाची मावशी
अंगाला चाटीत
असते पायाशीं
आजीच्या गादींत २

वाघाची मावशी
गुरूरू करीत
नातरी चुलीशीं
असेल घोरत ३

वाघाची मावशी
कशी ही मिशाळ
हालवी चाळवी
शेपूट खट्याळ ४

वाघाची मावशी
शिकार पाहून
हलक्या पाउलीं
चालते जपून ५

वाघाची मावशी
करुनी शिकार
निघाली तोंडीं हा
केवढा उंदीर ! ६





## ८ म्हातारी

म्हातारी बाइ म्हातारी
उन्हांत बसा दुपारीं

हातांत काठी घेऊन
टेंकत चाला वांकून !



## ९ घरकूल

चाल—या बाई या ]

छोटें घरकूल । पण पहा कशि कोपऱ्यांत मांडलि ही चूल
तांदुळ होते सात । पण पहा कसा झाला आहे पातेलीभर भात
चिमुटभर पीठ । पण पहा कशा तीन झाल्या भाकरि या नीट
पान घेतलें । अहो सकाळपासुन आहे माझें सोनें भुकेलें
वाढलें पिठलें । खरं सांगा तोंडाला ना पाणी सुटलें !



# १० कोंकरूं

चाल—नऊ वाजले ]

अहा कोंकरूं सफेत सुंदर
मान मुरडुनी बागडतें
टुणू टुणू हें नाचनाचतें
मला अतीशय आवडतें   १

पकडुन धरतां हाता लागति
केस मउमऊ कितीतरी !
चिमण्या ! उघडीं तोंड बघूं तुज
आले का ते दांत तरी   २

पाय मोडुनी मांडीवरतीं
लहानग्या ये बैस जरा
पापा घेऊन तुझा बघूं का
गोड लागतो किती खरा   ३

बें बें करुनी शेळीपाशीं
अरे निसटुनी गेलास
मला फसविलें म्हणून का तूं
नाचनाचसी शाबास!   ४



म. श्री. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र 6063 नों दि ...............
वि. बाल. वा क्र. ..................

# ११ घेशिल जवळ ?

चाल—भक्ति ग वेणी सारखी ]

झालों बाळ । म्हणजे ना घेशिल जवळ ?

ठेवुनि पायांवरतीं मजला
घालशील ना मग तोतोला
पाणी फिरवुन करशिल 'फू' ला
म्हणुनी बाळ । गुंडाळुन घेशिल जवळ ? १

सुशीसारखें दूधू पिउनी
पाळण्यांत मी जो जो करुनी
करीन गाई ऐकत गाणीं
उठतां बाळ । आई ! हा घेशिल जवळ ? २



# १२ पतंग

चाल – झाल्या तिनिसांजा सारखी ]

उंच उंच हा पतंग जात पहा आई ॥

माझ्यापरि वाटे हा
नव कपडे घालि अहा
फिरण्यातें नटुनि थटुनि हासत हा जाई १

माझ्यापरि ओढ घेत
आकाशीं दूर जात
नाचनाचुनीहि कसा डोलत हा राही २

माझ्यापरि चालुनियां
गेला का दमुनीयां
झोंप लागली म्हणून हालत हा नाहीं ३



अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

१३ भूर



आई येईल
बाळा घेईल
दूधू देईल
भूर नेईल

## १४ मोत्या

[ चाल — अम्हि काय कुणाचें खातों सारखी ]

हा मोत्या माझा खेळगडी
हा सोडुन मज नच जाय घडी


मउ झिपऱ्या याच्या अंगभरी
ह्या लांब मिशा हा सान जरी

मी येतां दे ताजीम खडी
मी देतां घे दांतांत छडी

मी शिकार करितां घेइ उडी
नी पोहुन जाई पैलथडी

परि खातां वांटा मजकडुनी
हा मागे शेपुट हालवुनी

मी थोपटतां पापे घेतो
हा बागडतो ! मज आवडतो !



# १५ हिरवी साडी

चाल — सुंदर मी होणार सारखी ]

हिरवी साडी । माझी । हिरवी साडी ।।



या आजोबा टेंका खालीं
नात पहा ही नेसुन आली
पहा पदर हा कांठ आणि जरीची काडी १

ये ग आई बघ ना कैशी
दिसते तूझी सोनी खाशी
ठेवुन देईं घांसायाचीं आज जरा भांडीं २

ये रे दादा जासी कोठें
पाहीं ताई कैशी दिसते
खालीं उतरुन पहा नको रे चालवूं गाडी ३

बूट घालुन अश्शी ठुमकत
शाळेला मी जाइन मुरकत
सज्जामध्यें सारी ऊभी राहील वाडी ! ४





# १६ झोपाळा

चाल — भक्ति ग वेणी सारखी ]

हा झोपाळा
लावुं का उंच आभाळा ? ॥

अक्का माई दूर व्हा जरा
झोका थोडा बंद हा करा
उभी राहुनी धरुं दे दोरां
वर न्यायाला ।
हा उंच उंच आभाळा १

झोंका चढतां वरतीं वरतीं
कपडे कैसे हे फडफडती
फुटले मजला पंख वाटती
गांठायाला ।
या उंच उंच आभाळा २

झोका चढला म्हणुनी गाणें
गातें आतां उंच गळ्यानें
म्हणा तुम्हीही आनंदानें
हा झोपाळा ।
लागुं दे उंच आभाळा ! ३



## १७ मिठू

मिठू मिठू पोपट
चोंच कशी लाल

विडा का कुठें
खाल्लास काल ?

नों. दि.
वाचनालय



## १८ खार

चाल—गुणी आणि अवगुणी सारखी ]

गोजिरवाणी खार
पहा ही गोजिरवाणी खार ॥

कधिं कौलांवर उन्हांत दिसते
सावलींतही कधिं आढळते
झाडांवरतुन सदान्कदाची
पळतां दिसते फार १

बसण्याची किति मोहक ऐट
खुलतें झुपक्याचें शेपूट
कुठुन आणिला कोट हिनें हा
पट्टेपट्टेदार ! २

हातिं चिमुकल्या बिया धरोनी
चुटुचुटु खाते फोडफोडुनी
कोणी दिसतां पोर लाजरी
धूम ठोकते पार ! ३

# १९ गौळणी होऊं !

चाल — उलट उलट माघारा सारखी ]

गौळणी होऊं । सयांनो । गौळणी होऊं
 घागरि घेउनि पाण्यालागीं यमुनेला जाऊं

घांसुनी घेऊं । घागरी । घांसुनी घेऊं
 यमुनेच्या या स्वच्छ जलानें भरूनियां नेऊं

चुंबळी ठेवूं । शिरीं या । चुंबळी ठेवूं
 घागरि घेऊनि चला वाटभर कृष्णनाम गाऊं १



गौळणी होऊं । सख्यांनो । गौळणी होऊं
हंड्या उतरुनि डेऱ्यामध्यें ओतुनियां देऊं

बांधुनी घेऊं । रवीला । बांधुनी घेऊं
घुम् घुम् डेरा घुमूं लागुं दे गाणीं या गाऊं

काढुनी घेऊं । लोणि हें । काढुनी घेऊं
कान्हा घेइल लोणी म्हणुनी छपवुनियां ठेवूं २



गौळणी होऊं । गडे ग । गौळणी होऊं
    नंदाघरिं छबकडा कन्हैया आहे का पाहूं

भांडुनी घेऊं । हरीला । भांडुनी घेऊं
    दूर कुठेंतरि पळवूं हरिला लपूं आणि लपवूं

सांवळा ठेवूं । मधें ग । सांवळा ठेवूं
    फेर धरूनी नाचूं भंवतीं रंगुनियां जाऊं ३





## २० कधीं होईन मोठा मी ?

चाल — सुनो ए जानमन सारखी ]

मुलांना खेळण्यापायीं सुचायाचें दुजें नाहीं
कसें हें नाकळे थोरां असूनी गोष्ट साधी ही

कुणा आणून द्या काठी कुणा आणून द्या वाटी
अशी चाले घरामाजी सदाची एक हाकाटी

कुणी ठेवा म्हणे दौती कुणी अभ्यास झाला का
दुजांच्या ह्या उठाठेवी कशालागीं हव्या लोकां

दळूनी आणुनी द्यावें असो किंवा नसो वेळ
परी चोरी पहायाची फुकाचा चालला खेळ

सदा उंचावरी कोठें कशा खाऊस ठेवावें ?
खरें सांगा मुलांनीं हें कशानें पोट जाळावें

न देती जागण्या थोडें न देती लोळण्या थोडें
करावें काय पोरांनीं ? सुटावें हें कसें कोडें

कधीं होईन मोठा मी ? कधीं संपेल हा काच
विन्या घे ! घांट ही झाली ! सुरू झाला तुझा जाच !



## २१ बोका

आला बोका
  दुधा धोका

बघा मोका
  आणि ठोका !

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.



## २२ सहल

चाल —— काय बाई पुण्याची तारीफ सारखी ]

यारे वनामधें जाऊं ॥

झाडावरतीं चिंचा दिसतिल
टोल्यासरशीं राशी पडतिल
वेंचुनि हव्या तशा घेऊं १

सुरपारंबी खेळ खेळुनी
उड्या मारुनी जातां दमुनी
सारे नदींत मग पोहूं २

झोंके घेउनियां फांद्यांवर
खातां कांदा चटणीभाकर
गाणीं नवीं नवीं गाऊं ३

गाइ परततां शेपुट उभवुनि
कृष्ण कुणी व्हा बलरामहि कुणि
हासत रमत घरा येऊं ४



अनुक्रम २७८४९
विभाग बा.वा.
ता. दि. ७।३।५९
वाचनालय

| | |
|---|---|
| अभिनयगीत | ५० नवे पैसे |
| किलबिल | ३७ नवे पैसे |
| क्रीडागीत | ५० नवे पैसे |
| बालविहार | ३७ नवे पैसे |
| छंदगीत | ५० नवे पैसे |

हीं मायदेवकाकांचीं
असल्याच गाण्यांचीं
आणखी पुस्तकें
बाबांना
लवकरच आणायला सांगा.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

वा. क्र. 6063
बा. वा



# छान छान त्या गोष्टी....

*थांबा, थांबा, आली आजी,*
*गोष्टी आतां सांगेल*
*छान छान त्या गोष्टी ऐकत*
*झोप आपणां लागेल*

*—इंदिरा सन्त*

हें असें किती दिवस चालावयाचें? आजी – जीजी, काका – मामा, दादा – बाबा, किती दिवस तुम्हांला गोष्टी सांगणार? त्यांना तुम्ही गोष्टीसाठीं किती भंडावणार? बाजूची यादी पाहा. नुसत्या गोष्टीच गोष्टी. गमतीच्या आहेत, मौजेच्या आहेत, छान आहेत, गोड आहेत, आजीच्या आहेत आणि माईच्या आहेत. तुम्हांला कुठल्या हव्यात?

IRBK-0107073
IRBK-0107073
गिरगांव, मुंबई

नये पैसे

★ गमतीच्या गोष्टी, १ ते ४, नेरूरकर, प्र० ३७
★ मौजेच्या गोष्टी, १ ते ३, ३०
★ छान गोष्टी, १ ते ३, अनु. २५, २५, ३७
★ नदीकांठच्या गोष्टी, का. रा. पालवणकर, २५
★ टेकडीवरच्या गोष्टी, ,, ,, २५
★ गच्चीवरच्या गोष्टी, ,, ,, २५
★ सादीच्या गोष्टी, द. ग. प्रधान, १९
★ गोड गोष्टी, १ ते १०, साने गुरुजी, प्र० १·००
★ ऐतिहासिक गोष्टी, ग. म. वैद्य, ३७
★ मनोरंजक गोष्टी, ,, २५
★ थोरांच्या गोष्टी, ,, १-२-३, अनु. ६२, ७५, ८७
★ वेदांतील गोष्टी, १-२, श्रोत्रिय, प्र० १·००
★ पबूताईच्या गोष्टी, १–२, भागवत, प्र० ३७
★ माईच्या गोष्टी, १-३, सौ. दांडेकर, प्र० १·००
★ नऊ गोष्टी, ग. म. वैद्य, ३०
★ बारा गोष्टी, दा. वि. फफे, ४०
★ आईच्या गोष्टी, भा. म. वैद्य, ३०
★ सुरस गोष्टी, १-२, अनु. ३७, २८
★ नवीन गोष्टी, वि. म. घुले, ३७
★ आजीबाईच्या गोष्टी, १-२, प्र० ५०
★ नदीची गोष्ट, ताराबाई मोडक, ५०